MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
साय.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक – दिपक थोरात



बीड: चंपाषष्ठी निमित्त पाली येथील खंडोबाच्या यात्रा भरत असते, सोमवारी पाली येथील यात्रा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली,या ठिकाणी खंडोबाचे पुरातन मंदिर असुन दरवषी यात्रे निमित्त जिल्हातील खंडोबाचे भक्त यात्रेसाठी येत असतात चौसाळा येथील साई प्रोव्हिजन व साई प्रेम मोटर्स चे युवा उद्योजक करणसिंह परदेशी दर्शन घेताना.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –९० | मंगळवार दि.१९ डिसेंबर २०२३ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -90 | TUESDAY DT.19 DECEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# आरोग्य खात्यातील कंत्राटी भरतीचा निर्णय राज्य सरकारकडून मागे

राज्यात सरकारी नोकऱ्यांमध्ये सुरू असलेल्या कंत्राटीकरणावर तरुणांमध्ये चांगलीच नाराजी पसरली आहे. तरुणांचा रोष टाळण्यासाठी आता आरोग्य विभागात होणारी कंत्राटी नोकरभरतीचा निर्णय राज्य सरकारने मागे घेतला आहे. राज्यातील बेरोजगार तरुणांचा रोष टाळण्यासाठी राज्य सरकारने कंत्राटी भरतीचा निर्णय आज मागे घेतला. आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत यांच्या आरोग्य खात्यात मात्र लागोपाठ हजारो कोटींच्या सेवा ठेकेदारांमार्फत घेण्यासाठी निविदा काढण्यात आली होती.



यापैकी राज्यातील सर्व सरकारी रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रांची यांत्रिकी पद्धतीने साफसफाई करण्यासाठी काढलेली निविदा अखेर रद्द करण्यात आली आहे. वार्षिक ६३८ कोटींची ही निविदा होती. याद्वारे ५ वर्षांसाठी सुमारे ३२०० कोटी रुपये ठेकेदाराला दिले जाणार होते. ३०ऑक्टोबर रोजी ही निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती.

### याआधीदेखील कंत्राटी भरतीचा निर्णय रद्द

काही महिन्यांपूर्वी कंत्राटी नोकर भरती करण्याचा आदेश काढण्यात आला होता. यामध्ये काही महत्त्वाच्या शासकीय पदांचाही समावेश होता. राज्यातील तरुणांसह विरोधी पक्षांनी सरकारला या मुद्यावर धारेवर धरले होते. त्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कंत्राटी नोकर भरतीचा निर्णय मागे घेतला. कंत्राटी भरती ही आधीच्या सरकारचे पाप असून त्याचे ओझे आम्ही का उचलावे अशी टीकाही त्यांनी केली होती.

### संजय राऊतांकडून भ्रष्टाचाराचे आरोप

शिवसेना ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून आरोग्य विभागातील भ्रष्टाचाराकडे लक्ष वेधले होते. भ्रष्टाचार आणि खात्यातील सावळा गोंधळ यामुळे आरोग्य खाते पूर्णपणे सडले असल्याची बोचरी टीका त्यांनी केली. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत १४ उपसंचालकांची निवड झाली, पण त्यांच्याकडे 'नियुक्ती साठी प्रत्येकी ५० लाखांची मागणी केली. ही मागणी पूर्ण न झाल्याने त्यांना एकजात साईड पोस्टिंग मुंबई–पुण्यात दिल्या. त्यांच्याकडे पोस्टिंगसाठी पैशांची मागणी सुरूच असल्याचा आरोपही राऊत यांनी केला.

# आरक्षणासाठी विशेष अधिवेशन कशाला?



जालना: भानावर या आणि आंदोलन गांभिर्याने घ्या, मराठा आरक्षणासाठी विशेष अधिवेशनाचा घाट कशाला घालताय? आहे त्याच अधिवेशनात चार दिवस वाढवून घ्या आणि आरक्षण द्या अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली आहे. जे काही करायचं आहे ते २४ पर्यंत करा, त्यानंतर मात्र एक तासही वाढवून मिळणार नाही असा इशाराही त्यांनी दिला. मनोज जरांगे म्हणाले की, हे सरकार विशेष अधिवेशनाच्या नावाखाली वेळकाढू पणा करण्याचा प्रयत्न करतयं. विशेष अधिवेशनाचा घाट घालून वेळकाढूपणा करू नका. ओबीसी आरक्षणाला धक्का न लागता आम्ही त्यामध्ये बसतोय, बाकी कशातून आरक्षण दिला तर ते टिकणार नाही. त्यामुळे बाकी आरक्षण देऊन सरकारने मराठ्यांची फसवणूक करू नये. राज्यातील सर्व मराठे एकच असल्याचं सांगत मनोज जरांगे म्हणाले की, विदर्भातील मराठे आणि मराठवाड्यातील मराठ्यांचे संबंध आहेत, पश्चिम महाराष्ट्रातील मराठे नातेवाईक आहेत. त्यामुळे राज्यातील सर्व मराठे एकच आहेत. सध्या आरक्षण हा एकच विषय आहे, त्यामुळे आपापसातील मतभेद बाजूला सारावं आणि मराठा आरक्षणासाठी एकत्र यावं.आई कुणबी असेल तर अपत्यांना आरक्षण द्या अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली. ते म्हणाले की, शिंदे समितीने दिलेल्या अहवालाच्या आधारे मराठ्यांना आरक्षण द्या. मराठे आणि कुणबी हे एकच असून त्यांना ओबीसीतून आरक्षण द्यावं.

## एसपींच्या पथकाचा दणका वेलडण पि आय गणेश मुंडे




चोरटी वाळू वाहतूक करणाऱ्या दोन वाहनांसह १५ लाखांचा मुद्देमाल जप्त

बीड (प्रतिनिधी)

तालुक्यातील नेकनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरटी वाळू वाहतूक करणारे दोन टेम्पो सोमवारी पोलीस अधिक्षक पथक प्रमुख गणेश मुंडे यांनी ताब्यात घेतले आहेत. या कारवाईत १५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. बीड जिल्ह्यात वाळू माफियांच्या विरोधात गणेश मुंडे यांनी कारवाईची मोहीम जोरदार राबवली आहे. वाळू साठ्यांसह आता वाहनातून होणाऱ्या चोरट्या वाहतूकीवर एसपींच्या पथकाने कारवाई करण्यास सुरुवात केली. सोमवारी नेक्नूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन टेम्पोमधून वाळूची वाहतूक सुरु होती. विशेष म्हणजे या टेम्पोत वरी खडी आणि खाली वाळू असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे दोन्ही टेम्पो पोलिसांनी जप्त केले असून यात १५ लाखांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला.

# लोकसभेतून सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे निलंबित



राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे आणि अमोल कोल्हे यांना लोकसभेतून निलंबित करण्यात आले आहे. विरोधी पक्षाच्या ९२ खासदारांच्या निलंबनावर खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, आम्ही फक्त संसदेच्या सुरक्षा भंगाच्या घटनेवर सरकारकडून उत्तर आणि सभागृहात चर्चा करण्याची मागणी करत होतो. हा महत्त्वाचा मुद्दा आहे पण सरकार त्यापासून पळ काढत आहे, अशी प्रतिक्रिया सुळे यांनी माध्यमांशी संवाद साधताना दिली.

हिवाळी अधिवेशन समाप्तीपर्यंत ९२ खासदारांना करण्यात आले निलंबित

संसदेच्या सुरक्षा भंग प्रकरणात गृहमंत्री अमित शहांच्या निवेदनासाठी गोंधळ घालणार्या विरोधकांवर निलंबनास्त्र चालले. लोकसभा आणि राज्यसभेमध्ये गैरवर्तनाचा ठपका ठेवून पिठासीन अधिकार्यांनी आज तब्बल ७८ खासदारांना निलंबित केले होते. यामध्ये लोकसभेतील ३३ तर राज्यसभेतील ४५ खासदारांचा समावेश होता. मागील आठवड्यात दोन्ही सभागृह मिळून १४ खासदार (लोकसभेतील १३ आणि राज्यसभेतील १) निलंबित झाले होते. त्यानंतर सोमवारी ७८ खासदारांचे निलंबन झाले. अशाप्रकारे विरोधी बाकांवरील तब्बल ९२ खासदारांची संसदेतून हिवाळी अधिवेशन समाप्तीपर्यंत गच्छंती झाली आहे. दोन्ही सभागृहांमध्ये सर्वोच्च आसनाचा अनादर केल्याबद्दल लोकसभेतील तीन आणि राज्यसभेच्या अकरा खासदारांवर हक्कभंगाच्या कारवाईची शिफारस देखील झाली आहे.आज १९८९ च्या इतिहासाची पुनरावृत्ती झाली. १९८९ मध्ये भाजपसह तत्कालीन विरोधी पक्षांच्या खासदारांनी बोफोर्स प्रकरणी ४०० हून अधिक खासदारांसह भक्कम बहुमत असलेल्या राजीव गांधींच्या सरकारला कोंडीत पकडण्यासाठी लोकसभेतून सामूहिक राजीनामे दिले होते. बोफोर्स प्रकरणी संसदेत आवाज उठवू दिला नाही, असा आरोप करत संपूर्ण विरोधकांनी लोकसभेतून सामूहिक राजीनामे दिले आणि त्यानंतर १९८९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला




भाजफा नेते डॉ अभय वनवे
पंकजाताई,प्रितमताई यांचे विश्वासू सहकारी याना
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
– शुभेच्छुक –
सायं दैनिक महाराष्ट्र आरंभ

## भ्रष्टाचार लपविण्याचा परळी वनपरक्षेत्र कार्यालयाने शोधला नवा फंडा, माहिती लपविण्यासाठी मनुष्यबळ नसल्याचे दिले कारण

परळी (प्रतिनिधी)

माहिती अधिकार आधारे मागविलेली माहिती देण्याऐवजी परळी वनपरक्षेत्र कार्यालयाने भ्रष्टाचार लपविण्याचा नवा फंडा शोधून काढला आहे. मागितलेली माहिती लपविण्यासाठी मनुष्यबळ नसल्याचे कारण देत चक्क अर्ज निकाली काढण्याची घटना उघडकीस आली आहे. यामुळे माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन झाल्याचे उघड होत आहे. याबाबत अधिक माहिती अशी की गणेश पंढरीनाथ आदोडे यांनी दिनांक २५ सप्टेंबर २०२३ रोजी परळी वनपरिक्षेत्र कार्यालयात माहिती अधिकार अर्ज दाखल केला होता. या माहिती अधिकार अर्जाद्वारे त्यांनी वनपरिक्षेत्र कार्यालयाशी संबंधित माहिती मागितली होती. परळी वन विभागाने माहिती देण्याऐवजी उडवा उडवीचे लेखी उत्तर दिले.



परळी वनपरिक्षेत्र कार्यालयाने आदोडे यांना दिलेले लेखी उत्तर अत्यंत हास्यास्पद असे आहे. एकाच पत्रात कार्यालयाने दोन खुलासे केले आहेत. त्यामध्ये म्हटले आहे की मागितलेली माहिती विस्तृत आहे परंतु ती मोघम स्वरूपाची आहे. तर पत्राच्या शेवटी आपणास हवी असलेली माहिती प्रत्यक्ष कार्यालयात अवलोकना करिता उपलब्ध करून देण्यात येईल असे म्हटले आहे.

## लिंबागणेशकरांनी मराठा आरक्षण व शेतकरी विरोधी केंद्र सरकारची आपला संकल्प विकसित भारत यात्रा वेशीवरच अडवली:- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश (प्रतिनिधी)

केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजनांचे फायदे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावेत या उद्देशाने आपला संकल्प विकसित भारत योजना दि.१५ नोव्हेंबर ते २६ जानेवारी कालावधीत देशव्यापी मोहीम केंद्र सरकारच्या वतीने राबविण्यात येत असुन आज दि.१९ डिसेंबर मंगळवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश याठिकाणी सकाळी यात्रा आली असता मराठा आरक्षण आणि

केंद्र सरकारचे शेतकरी विरोधी धोरण या मुद्द्यावर गावच्या वेशीवर अडवली.एक मराठा लाख मराठा घोषणा देत मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटेपर्यंत शासकीय कार्यक्रम गावात घेऊ नयेत मागणीवर ठाम ग्रामस्थांनी कार्यक्रम अधिकारी भास्कर भस्मारे, पंचायत समिती ग्रामसेवक बीड,कृषी विभाग आनंद वाघ आदि कर्मचाऱ्यांना केंद्र सरकारला निरोप कळवा म्हणत केंद्र सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाच्या निषेधार्थ मोठमोठ्याने घोषणा बाजी करण्यात आली.



## भीम नगरमध्ये सिमेंट रस्ता कामास सुरुवात

# बीडमधील सुरू असलेली विकासकामे गतीने पूर्ण होतील–डॉ.योगेश क्षीरसागर

बीड (प्रतिनिधी)

शहराच्या विकासासाठी कोट्यवधींचा निधी मिळत आहे. सुरू असलेली विकासकामे गतीने पूर्ण होतील, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला.शहरातील जुना मोंढा रोड परिसरातील भीम नगरमधील अंतर्गत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम कामास सोमवारी सुरुवात झाली. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले, भीम नगर भागातील रस्ते, नालीसह प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही दिली. नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी



नगरसेवक बिभीषण लांडगे, ईश्वर धन्वे, रमेश वाघमारे, रुस्तूम बेद्रे, महादेव वाघमारे, विशाल मोरे, साजेद जागीरदार, मिलिंद ठोकळ, गौतम पावले, गुणाजी नरवडे, भाऊसाहेब पवळे, अनिल वीरभवन, दीपक जावळे, राजू वाघमारे, दिलीप आराखडे, विजय वाघमारे, योगेश पवळे, बाळु धन्वे, अजय जावळे, जितू धन्वे, अंकुश पवळे, दिलीप घोडके, संतोष वाघमारे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बालेपीर दर्गा परिसरात जाणून घेतल्या समस्या

शहरातील बालेपीर दर्गा परिसरात डॉ. योगेश क्षीरसागर यांनी भेट दिली. यावेळी स्थानिक नागरिकांकडून त्यांचे स्वागत करण्यात आले. दर्गासमोरील रस्त्यासह नालीचा प्रश्न सोडवावा. कंपाऊंड वॉलचे काम नव्याने करावे, अशी मागणी नागरिकांनी केली. या समस्या सोडविण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे डॉ. योगेश क्षीरसागर यांनी सांगितले. यावेळी नगरसेवक बाबा मेंबर, दर्गाह कमिटीचे काजी अजहर, जाकेर पठाण, आमिर मतीन साहब, चाँद भाई, अय्यूब खान, सय्यद जावेद , अफरोज भाई, रूबेज खान मोसीन, हबीब चाऊस, जमील खान अबरार, शकील शेख, हाफिज सफीर, काजी वजीर, रईस मिस्त्री आदींची उपस्थिती होती.

# सांस्कृतिक क्षेत्रात मानबिंदू ठरलेला जिल्हास्तरीय 'चंपवाती महोत्सव' बीडकरांच्या भेटीला!

## गतवर्षीपेक्षा अधिक भव्य दिव्य असणार यंदाचा चंपावती महोत्सव- प्रतिक कांबळे

बीड (प्रतिनिधी)

गतवर्षीच्या अफाट यशानंतर जिल्ह्याच्या सांस्कृतिक क्षेत्रात मानबिंदू ठरलेल्या जिल्हास्तरीय चंपावती महोत्सवाचे यावर्षी पुन्हा एकदा आयोजन करण्यात आले आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या अंगी सुप्त अवस्थेत दडलेल्या कलागुणांना वाव देण्याकरीता व नवं बाल कलाकारांना स्पर्धात्मक रंगमंच मिळावा उदात्त हेतूने गतवर्षी बीड कलाकारांनी एकत्रित येऊन नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला अशा विविध कलेच्या स्पर्धांना एकत्रित करून बीड शहरात जिल्हास्तरीय चंपावती महोत्सवाचे आयोजन केले होते. या महोत्सवासाठी जिल्हाभरातून ३२४० बालकलाकारांनी सहभाग घेतला होता तर शेकडो शाळा मोठ्या उत्सहाने या महोत्सवामध्ये सहभागी झाल्या होत्या. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारी महोत्सव पुन्हा एकदा व्हावा अशी इच्छा जिल्ह्याभरातून बालक पालक तथा शाळा शिक्षकांनी व्यक्त केली आहे त्यामुळे पुन्हा एकदा यावर्षी भव्य दिव्य चंपावती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. चंपावती महोत्सव जानेवारी महिन्यात नियोजित असून तारीख लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे चंपावती महोत्सव संयोजन समितीचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे यांनी सांगितले आहे.

या स्पर्धा होणार चंपवाती महोत्सवात!

यंदा चंपावती महोत्सवामध्ये वैयक्तिक नृत्य, समूह नृत्य, एकपात्री अभिनय, फॅन्सी ड्रेस, वैयक्तिक गीतगायन स्पर्धा, समूह गीतगायन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आणि विशेष म्हणजे फॅमिली डान्स या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या चंपावती महोत्सवामध्ये जिल्ह्यातील सर्व शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग होणार असून या स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात



पारितोषिके, प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत तर प्रत्येक स्पर्धा प्रकारातील संपूर्ण सहभागी स्पर्धकास प्रमाणपत्रही देण्यात येणार आहेत. याबरोबरच जी शाळा नृत्य, गायन, एकपात्री अभिनय, चित्रकला यासह सर्व स्पर्धा प्रकारातून सर्वाधिक बक्षीसांची संख्या प्राप्त करणार आहे त्या शाळेस जिल्यातील सर्वोत्कृष्ट शाळा (बेस्ट स्कूल ऑफ दी इयर चॅम्पियनशिप) म्हणून आकर्षक करंडक बहाल करण्यात येणार असल्याची माहिती चंपावती महोत्सवाच्या संयोजन समितीने दिली आहे.

गतवर्षीपेक्षा चंपावती महोत्सव अधिकपट भव्य-दिव्य असणार- प्रतिक कांबळे

रंगमंचावर आकर्षक विद्युत रोशनाई, भरगच्च बक्षिसे, गिफ्टस, प्रमाणपत्र आणि प्रतिष्ठित मान्यवरांच्या उपस्थित बाल कलाकारांच्या विविध कलेचे सादरीकरण होणार असून चंपावती महोत्सव बीडकरांच्या डोळ्यांची पारणे फेडणारा अद्भुत असेल अशी माहिती प्रतिक कांबळे यांनी दिली आहे. बीड जिल्ह्यात अनेक कला शिक्षक उत्तमरित्या आपले कार्य करत आहेत व कलाक्षेत्रात विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी आपले मोलाचे योगदान देत आहेत. अशा अनेक कला शिक्षकांना चंपावती महोत्सवामध्ये प्रतिष्ठित मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये जिल्ह्यातून उत्कृष्ट नृत्य शिक्षक, उत्कृष्ट संगीत शिक्षक, उत्कृष्ट अभिनय शिक्षक, उत्कृष्ट चित्रकला शिक्षक अशी विविध पारितोषिके देण्यात येणार आहेत. एकंदरीत सांगायचे म्हणजे गतवर्षीपेक्षा चंपावती महोत्सव अधिकपट भव्य-दिव्य असणार असे चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे यांनी सांगितले आहे.

फॅमिली डान्स स्पर्धा असेल मुख्य आकर्षण

बाल कलाकारांसाठी घेण्यात येत असलेल्या चंपवाती महोत्सवामध्ये खास महिला भगिनींच्या खास आग्रहास्तव यंदा फॅमिली डान्स या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये संपूर्ण फॅमिली एकत्रित येऊन ग्रुप डान्स करू शकते किंवा आई- मुलगा, आई-मुलगी, वडील-मुलगा, वडील-मुलगी, नवरा-बायको, दोन भावजया, सासू सुना, बहिणी-बहिणी, भाऊ-भाऊ, आजी-आजोबा आणि नातवंडे असे कोणतेही नातलग जोडी नृत्य किंवा समूह नृत्य सादर करू शकतात. यासाठी कुठलेही वयाचे बंधन नाही. फॅमिली डान्ससाठी नियम एकच नातलग असावे.



## लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णूभाऊ कसबे साहेबांच्या कष्टाला लवकरच येणार यश..!

मातंग समाजाच्या सर्वंच प्रलंबित मागण्या पुर्ण करण्यासाठी महाराष्ट्र सरकार लवकरच ठोस निर्णय घेणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांनी शिष्टमंडळाला बोलताना सांगितले .लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णूभाऊ कसबे साहेब यांच्या नेतृत्वामध्ये दिनांक १६ नोव्हेंबर पासून पुणे ते नागपूर आरक्षण क्रांती पायी पदयात्रेचे आयोजन केले होते,सदर पदयात्रा २७ दिवसाचा पायी प्रवास करून व बाराशे साठ किलोमीटरचे अंतर पायी चालत दिनांक १३ डिसेंबर रोजी यशवंत स्टेडियम नागपूर या ठिकाणी हिवाळी अधिवेशनावर प्रचंड महामोर्चाने पदयात्रेची सांगता करण्यात आली,सदर महामोर्चाला डझनभर आमदार मंत्री महोदय तसेच महाराष्ट्रासह देशभरातील मातंग समाज बांधवांनी लाखोंच्या संख्येने हजेरी लावली होती.

# मराठवाड्यातील सर्वात मोठ्या आष्टी येथे होणाऱ्या कृषी प्रदर्शनास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे - सभापती अनिल जायभाय

पाटोदा (प्रतिनिधी)

शेतकऱ्यांचे नेते माजी आ.भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतुन आष्टी, पाटोदा, शिरुर मतदार संघात प्रथमच होत असलेल्या कृषी प्रदर्शनाचा शेतकरी बांधवांनी भेट देऊन लाभ घ्यावा असे आव्हान पाटोदा पंचायत समितीचे माजी सभापती अनिल जायभाय यांनी केले आहे. माजी आमदार शिक्षण महर्षि भीमराव जी धोंडे साहेब यांच्या संकल्पनेतुन,आष्टी येथील छत्रपती शाहू,फुले,

आंबेडकर कृषी महाविद्यालयाच्यावतीने दि.२४ ते २७ डिसेंबर २०२३ या कालावधीतील चार दिवसीय डॉ.स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे.या कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन कृषीमंत्री धनंजय मुंडे,माजी मंत्री पंकजाताई मुंडे,कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल,मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.इंद्रमणी, पद्मभूषण पोपटराव पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे.आज या राज्यस्तरीत कृषी प्रदर्शनाचे संपर्क कार्यालयाचे उद्घाटन झाले.या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनात मोठ्या संख्येने शेतकऱ्यांना सहभाग घ्यावा असे आव्हान अनिल जायभाय यांनी केले आहे. आष्टी येथे होणारे



राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन ..न भुतो न भविष्यती...होत आहे. हे कृषी प्रदर्शन चार दिवस आहे. कृषीविषयक प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी आनंदपर्वणी ठरणार आहे.शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन करीत कायम दुष्काळी तालुका म्हणून ओळख असणारा हा आष्टी तालुका आहे. या तालुक्यात कृषी प्रदर्शन घेण्याचे योग आपल्याला आला आहे. आष्टी शहरात दि.२४ ते २७ डिसेंबर २०२३ चार दिवस राज्यस्तरीय डॉ.स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे पहिल्यांदाच होत आहे .या कृषी प्रदर्शनामध्ये छत्रपती शाहू, फुले, आंबेडकर कृषी महाविद्यालयातील उभारलेले उद्योग व त्यांचा अनुभव कथन करण्यासाठी उभारण्यात येणारी यशस्वी विद्यार्थी व्यावसायिकांची दालने या प्रदर्शनीचे आकर्षण ठरणार आहे.

या कृषी प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण दोन कोटी किमंतीचा दीड टन वजनाचा रेडा असणार आहे.या प्रदर्शनात डेअरी तंत्रज्ञान,कृषी तंत्रज्ञान, सोलर शासकीय योजना,शेती अवजारे,बी-बियाणे, कुक्कुटपालन खते,सिंचन, पतपुरवठा,हरितगृह, खाऊ गल्ली,लहाण मुलांसाठी खेळ गल्ली यासह विविध कृषी पिकासंदर्भात तज्ञ मार्गदर्शक मार्गदर्शन करणार आहेत यामुळे पाटोदा तालुक्यातील व्यापारी,वकील,डॉक्टर, पत्रकार शेतकरी बांधवांनी आष्टीत होणार्या मराठवाड्यातील सर्वात मोठ्या कृषी प्रदर्शनास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे माजी सभापती अनिल जायभाय यांनी केले आहे.



लोकनेते मुंडे साहेब यांची जयंती गावोगावी साजरी करावी या आदेशाने मी बोरगाव चकलायेथील शालेय विद्यार्थ्यांना मुंडे साहेबांचे फोटो सहित वही आणि पेन त्याचबरोबर नाश्ता असा कार्यक्रम यामध्ये अंगणवाडी सेविका यांना साडीचोळी देऊन सत्कारित केले विशेष म्हणजे विद्यार्थ्यांच्या समोर साहेबांची घोषणा अमर रहे अमर रहे मुंडे साहेब अमर रहे यास विद्यार्थ्यांनी गावकरी यांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला समाधान वाटल.



आंबेडकरी चळवळीतील एक अभ्यासू व्यक्तिमत्व .महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे. संस्थापक / अध्यक्ष. माननीय श्री संजय (भैय्या )सोनवणे हे काल हिवाळी अधिवेशनानिमित्त नागपूरला चालले असता त्यांचा गेवराई येथील शासकीय विश्रामगृह येथे भव्य सत्कार करण्यात आला याप्रसंगी जिल्हाध्यक्ष विकास गायकवाड (सामाजिक कार्यकर्ते) सतीश जी प्रधान. लक्ष्मण उमाप साहेब .आप्पासाहेब मस्के युसुफ शेख. उमेरशेख. गणेश दिवाण. अनिल आतकरे कैलास प्रधान इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

# दिंद्रुड ग्रामपंचायतच्या मनमानी कारभारविरोधात भिम अर्मि आक्रमक

## पंचायत समितीला महिलांसह आमरण उपोषण

माजलगाव (प्रतिनिधी)

तालुक्यातील दिंद्रुड ग्रामपंचायतच्या मनमानी कारभाराला कंटाळून भीम आर्मी जिल्हाध्यक्ष सिद्धार्थ मायंदळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंचायत समिती माजलगाव येथे उमरन उपोषणाला महिलांचाही पाठिंबा मिळाला आहे. माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड ग्रामपंचायत कायमच वादाच्या भोवऱ्यात असून या ग्रामपंचायतचे सरपंच,ग्रामसेवाकविराधात अनेक तक्रारी अर्ज देऊनही या ग्रामपंचायतचे मनमानी कारभार काही थांबत नाही. या आधीही तक्रारी दिल्या आहे परंतु याला काही अधिकारीच पाठीशी घालत असुन वारंवार कोणतीही चौकशी न

करता ग्रामपंचायतीला मनमानी कारभार व बोगस कामे करण्यासाठी प्रोत्साहन देत असल्याचे सध्या चित्र दिसत आहे. काही दिवसांपूर्वी दलित वस्तीवरील आर ओ प्लाट इतरत्र बसवल्याची तक्रार भीम आर्मी जिल्हाध्यक्ष सिद्धार्थ मायंदळे यांनी दिली व कारवाही करा अन्यथा उमरण उपोषण करू असा इशारा दिला असतांना सुद्धा येथील सरपंचाला पाठिशी घालून कोणतीही कार्यवाही केली नसल्याने सिद्धार्थ यांनी दलित वस्तीवर होणाऱ्या अन्याया विरोधात पंचायत समितीवर महिलांसह अमरण उपोषणास बसले आहे. दिंद्रुड ग्रामपंचायतीचे सरपंच हे जाणून बुजून दलित समाजाला जाणून बुजून शासनाच्या योजनेसाठी वंचित ठेवत आहे. यापूर्वीही येथील महिलेने जिल्हाधिकारी यांना



घरकुलसाठी निवेदन देऊन इच्छा मरणाची परवानगी माघीतली होती दलित समाजावरील ह्या अन्यायाला कंटाळून जिल्हाध्य सिद्धार्थ मायदळे यांनी खलील मागण्यांसाठी माजलगाव येथील पंचायत समितीवर आमरण उपोषणास बसले आहे. दिंद्रुड येथील दलित वस्तीवरील आर ओ प्लांट सवर्ण वस्तीवर बसवले आहे ते पुन्हा दलित वस्तीवर बसवण्यात यावे, जोपर्यंत हे काम पूर्ण होत नाही बिल काढण्यात येऊ नये, दलित वस्तीवर पिण्याच्या पाण्यासाठी बोअर घेण्यात यावे, बौद्ध विहाराकळे जाणाऱ्या रस्त्यावर अतिक्रमण केले असून अतिक्रमण हटवून रास्ता खुला करण्यात यावा, रमाई आवास योजनेअंतर्गत घरकुल धारकांना त्यांच्या घराचे कामे चालू असताना सुद्धा जाणून बुजून त्यांचे हप्ते अडवण्यात आले असून त्या लाभधारकांना हप्ते काढण्यासाठी कसलीही अडचण येऊ नये, दलित समाजाला जाणून बुजून शासनाच्या विविध योजनेपासून वंचित ठेवणाऱ्या ग्रामपंचायतीवर चौकशी करून योग्य कार्यवाही करण्यात यावी अश्या प्रकारच्या मागण्या घेऊन पंचायत समिती समोर भीम आर्मी जिल्हाध्यक्ष सिद्धार्थ मयंदळे यांच्या मार्गदर्शनाखाली सचिन देशमाने, सुरेश देशमाने, किरण धुमाळ, ईश्वर कसबे, भगवान देशमाने, जणत कांबळे,रमा देशमाने, सुनीता देशमाने,पवित्रा माने व इतर महिला व पुरुष यांचा सहभाग होता.

# आधुनिक युगात बहुरूपी कला पावतेय लोप

## मोबाइलमुळे करमणुकीची साधने वाढली, आता अनेकांचा जगण्यासाठी संघर्ष


टाकरवण (प्रतिनिधी)

**अंगात पोलिसांची वर्दी, हातात खेळण्यातील बंदूक, डोक्यावर टोपी, कमरेला पोलिस पट्टा, तोंडात शिट्टी आणि खांद्याला अडकवलेली व प्रमाणपत्रांनी भरलेली फाटकी पिशवी, हे चित्र आहे एका बहुरूपी कलाकाराचे. महाराष्ट्रात विविध प्रकारचे लोककलावंत आहेत.बहरूपी हा त्यातीलच एक प्रकार. हे कलाकार कोणाचीही हुबेहूब नक्कल करून सर्वांना आनंद देऊन आपली उपजीविका भागवतात.यामध्ये प्रामुख्याने फौजदार, पोलिस यांची वेषधारण करून गावोगावी फिरून आपल्या संसाराचा गाडा हाकतात. मात्र, आज या बहुरूपी कलावंतांचे पोटापाण्याचे हाल होताना दिसत आहे.**


महाराष्ट्रात बहुरूपी कला छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून चालू झाली होती. सध्या काळाच्या ओघात ही बहुरूपी कला लोप पावत आहे. टाकरवण येथे बहुरूपी कलाकार विलास गोरक शेगर(रा. घोडेगाव, ता. नेवासा, जि. अहमदनगर) हे पोलिस वेशात बाजारपेठेच्या प्रत्येक दुकानात जाऊन पोलिसी खाक्या दाखवत फिरत होते. शेगर, हे वयाच्या दहाव्या

आमच्या बहुरूपी समाजासमोर शिक्षण, आरोग्य

वर्षांपासून बहुरूपी म्हणून गावागावात जातात. वर्षानुवर्षे ते ज्या गावात जातात, तेथील नागरिकांशी त्यांचे दोन ते तीन पिढ्यांपासूनचे संबंध आले असल्याचेही त्यांनी सांगितले. अगदी ज्येष्ठ नागरिकांपासून लहानांपर्यंत त्यांची ओळख असते. तसेच कोणाच्या मुलीहे महत्त्वाचे प्रश्न आहेत. पोट भरण्यासाठी गावोगाव भटकंती करावी लागत असल्याने शासकीय योजनांची माहितीही



मिळत नाही. त्यातच गेल्या काही दिवसांत बहुरूपींना दान देण्याचे प्रमाणही कमी झाल्याने अनेक कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली आहे. - विलास गोरक शेगर, बहुरूपी कलाकारकोठे दिल्या. ठराविक नागरिकांची सासरवाडी कोठे आहे, काहींच्या बहिणी कोठे दिलेल्या आहेत, आदींबाबत माहितीही बहुरूपी ठेवत असल्याचे शेगर म्हणाले. मोबाईलच्या रूपानं करमणुकीची साधनं थेट हातात आल्यामुळे बहुरूपी कलाकारांवरउपासमारीची वेळ आली आहे. पोलिसांच्या वेशात येणाऱ्या या कलावंतांना भामटे व फसवेगिरी करणारे लोक समजून त्यांना जनतेच्या रोषाला देखील अनेकदा सामोरे जावे लागते. निरनिराळी सोंग करणारी ही बहुरूपी जमात आता काळाच्या ओघात लुप्त होत असल्याचे पहावयास मिळत आहे. परंतु, आजच्या या धावपळीच्या जगात विलास गोरक शेगर यांनी ही कला जिवंत ठेवल्याने साऱ्यांनी त्यांचे कौतुक केले. सद्यपरिस्थितीत बहुरूपी कलाकारांना सध्याची पिढी ओळखतही नाही.





# श्री बजरंगबली वेताळ मंदिरात २५ डिसेंबरला श्री दत्त जन्मोत्सवाचे आयोजन

## भाविकांनी धार्मिक कार्यक्रमाचा उपस्थित राहावे- प.पू.श्री विलासानंदजी महाराज

परळी (प्रतिनिधी)

श्री बजरंगबली वेताळ मंदिर येथे सोमवार दि.२५ डिसेंबर २०२३ रोजी श्री दत्त जन्मोत्सव सोहळयाचे भव्य दिव्य आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमास भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजक प.पू.श्री विलासानंदजी महाराज यांनी केले आहे.

शहरातील ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथ मंदिर परिसरात असलेल्या श्री बजरंगबली वेताळ मंदिरात श्री दत्त जन्मोत्सवानिमित्त दि.२५ डिसेंबर रोजी प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी विविध धार्मीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



बीड येथील कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी शेख जुबेर यांची पीएसआय पदी पदोन्नती झाल्याबद्दल पीआरपी व सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे सत्कार करण्यात आला त्याप्रसंगी पीआरपीचे जिल्हाध्यक्ष अनिल तुरुकमारे, शहर पोलीस ठाण्याचे ठाणे आमदार प्रसाद जोंधळे, एएसआय अतुल कचरे ,संपादक बालाजी जगतकर,देविदास जंगले, श्रीरंग वाघमारे विठ्ठलराव घोडेराव,शेख फिरोज, शेख निसार, शेख शन्नू,अंबादास गुंजाळ,आधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माजी आ.धोंडेच्या संकल्पनेतील ऐतिहासिक कृषी प्रदर्शनाचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा-शंकर देशमुख

आष्टी (प्रतिनिधी)

शेतकऱ्यांचे नेते माजी आ.भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतुन आष्टी, पाटोदा,शिरुर मतदार संघात प्रथमच होत असलेल्या कृषी प्रदर्शनाचा शेतकरी बांधवांनी भेट देऊन लाभ घ्यावा असे आवाहन बीड जिल्हा भाजप सरचिटणीस शंकर देशमुख यांनी केले आहे माजी आमदार शिक्षण महर्षि भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतुन, आष्टी येथील छत्रपती शाहू,फुले, आंबेडकर कृषी महाविद्यालयाच्यावतीने दि.२४ ते २७ डिसेंबर २०२३ या कालावधीतील चार दिवसीय डॉ.स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे.या कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन कृषीमंत्री धनंजय मुंडे,माजी मंत्री पंकजाताई मुंडे,कृषी मुल्य आयोगाचे अध्य



बीड: तालुक्यातील वासनवाडी ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी अंकुश खोड यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर समवेत दादासाहेब घोलप ,रघुनाथ घोलप,अशोक भावले ,राजाभाऊ बंगाळ, अशोक दळवी ,अशोक खरसाडे आदि.

# सुपर वॉरियर्स बैठक संपन्न

भारतीय जनता पार्टी प्रदेश उपाध्यक्ष तथा बीड जिल्हा लोकसभा समन्वयक माननीय डॉ अजित गोपछडे व भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत आज संघर्षयोद्धा भाजपा जनसंपर्क कार्यालय बीड येथे महाविजय २०२४ अनुषंगाने बीड विधानसभा मतदार संघातील सुपर वॉरिअर्स संवाद बैठक संपन्न झाली. या बैठकीस जिल्हा पदाधिकारी, पी.टी चव्हाण, नवनाथ शिराळे, विक्रांत हजारी, चंद्रकांत फड, शंकर देशमुख, अशोक लोढा, डॉ. लक्ष्मण जाधव अजय सवाई, दत्ताभाऊ नलावडे, बालकिसन सिक्ची, विजयकुमार धांडे, अजय धोंडे, बालाजी पवार, ओमप्रकाश गिरी, किरण बांगर, भूषण पवार, शांतीनाथ डोरले, सुनील मिसाळ, संग्राम बांगर, दादासाहेब नन्नवरे, बाबुराव परळकर, जालिंदर सानप, लालासाहेब पन्हाळे, डॉ. जयश्रीताई मुंडे, ड. संगीताताई धसे, मीराताई गांधले, छायाताई मिसाळ, लताताई मस्के, लताताई राऊत, प्रीतताई कुकडेजा, शीतलताई राजपूत, लताताई बुंदेले, संजवनीताई राऊत, शेख शफिक पेंटर, राजू शहाणे, प्रमोद रामदासी, बद्रीनाथ जटाळ, संतोष गवळी, राजेश चरखा, सुरेश माने, मच्छिंद्र सानप, महेश सावंत, रवींद्र कळसाने, अश्विन शेळके, - रमेश राऊत, गणेश वाणी, बंटी भिसे, संदीप बहिरवाळ, बापूसाहेब जाधव, अशोक वैद्य, संजय काळे, भारत खोड, डोळस बाळासाहेब, नरेश पवार, शरद घोलप, अनिल शेळके, बाळू गात, राहुल



साळुंके, विठ्ठल ढोकणे, विठ्ठल ठोकळ, वसंत गुंदेकर, पांडुरंग कानडे, किशोर शेळके, अप्पासाहेब झोडगे, ज्ञानेश्वर आंधळे, प्रशांत शेळके, चंदू शेळके, विठ्ठल शिंदे, नानासाहेब शिंदे, राम चव्हाण, विशाल पाखरे, गणेश शेंडगे, गणेश तोडेकर, अभिषेक भावले, अभय चव्हाण, राहुल मुळे, अजय ढाकणे, राकेश बिराजदार, उमेश खेडकर, केशव बडे, सचिन आगाम, काळे छगन, दादासाहेब मतकर आदी उपस्थित होते. या बैठकीदरम्यान बीड विधानस मतदार संघातील वायभटवाडी येथील माजी सरपंच श्री महादेव निर्धार यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.



केज मतदारसंघातील नांदुरघाट गटातील खरमटा, धोतरा, मुंडेवाडी येथील रस्त्यांचा कामाचा शुभारंभ अक्षय भैय्या मुंदडा यांच्या शुभहस्ते करण्यात आला यावेळेस तालुकाध्यक्ष भगवान केदार,राजाभाऊ पाटील, अंकुश वाघ, जाधव सर,आर. डी.जाधव, कृष्णा मेसे, बाबा शिंदे, विशाल हावळे, हनुमंत हांडगे, अलीम सय्यद,जाधव अशोक,शिवाजी जाधव, जावेद शेख, संतोष जाधव, सुनील घोळवे, राहुल गदळे,भिसे साहेब, सासवडे मॅडम व सर्व मान्यवर.



बीड लोकसभा संयोजक पदी श्री.दादासाहेब लक्ष्मणराव नन्नवरे येणाऱ्या २०२४ च्या लोकसभा या तोंडावर आल्या आहेत, आणि याची रणधुमाळी सुरू झाली आहे. याचीच रणनिती म्हणून भाजपा कामगार मोर्चा ने तथा पंकजाताई मुंडे व खासदार प्रितमताई मुंडे यांनी लोकसभा संयोजक म्हणून भाजपा कामगार मोर्चा प्रदेश सदस्य तथा मराठवाडा अध्यक्ष श्री.दादासाहेब लक्ष्मणराव नन्नवरे यांची निवड केली आहे. या नियुक्ती चे पत्र महामंत्री संजयजी केनेकर आणि विजयजी हरगुडे यांनी संभाजीनगर येथे भाजपा पदाधिकारी बैठकीत दिले. महाविजय २०२४ साठी भाजपा सज्ज आहे. या निवडीचे भाजपा जिल्हा अध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी स्वागत करुन शुभेच्छा दिल्या आहेत.

## आदित्य कृषि महाविद्यालयातील कृषीदुतांनी दिली पिंगेवडी येथील शेवगाव तालुका सहकारी दुध उत्पादक प्रक्रिया संघाला भेट




बीड (प्रतिनिधी)

आदित्य कृषि महाविद्यालयातील चौथ्या वर्षातील कृषि कार्यानुभवाचे कृषिदुत कृषिदूत प्रफुल देवगडे, राम गडदे, महेश कवडेवार, उमेश गायकवाड, अमोल चव्हाण, ज्ञानेश्वर गौरकर, भागवत शिंदे, विशाल गंदरेवाड यांनी पिंगेवडी येथील शेवगाव तालुका सहकारी दुध उत्पादक आणि प्रक्रिया संघाला भेट दिली आणि तेथे विविध प्रात्यक्षिक करण्याचे प्रशिक्षण घेतले. यावेळी कृषिदूत यांना संघाचे दत्ता तानवडे सर यांनी विविध दुध उत्पादक नव तंत्रज्ञान आणि प्रक्रिया याचे मार्गदर्शन केले.

कृषीदुतांनी सर्वप्रथम श्री. दत्ता तानवडे सरांची भेट घेऊन त्यांच्यासोबत दुध आणि प्रक्रिया संघाची एक महिना विविध नव नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग आणि विविध प्रकारचे प्रॉडक्ट्स बनवण्याची प्रक्रिया याचे मार्गदर्शन घेतले. त्यानंतर कृषी दूतांनी विविध विभागांची कार्य आणि व्यवस्थापन अधिकारी यांचे काम कसे चालते ते समजावून घेतले. तसेच यावेळी कृषीदूतांनी संघामध्ये एक्का प्रक्रिया,लहशीीश ीलिशीीळपस, याबद्दल संपुर्ण माहिती प्राप्त केली. यावेळी कृषीदूतांना श्री दत्ता तानवडे सरांनी सहकार्य केले.

यासाठी कृषीदूतांना आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदितीजी सारडा, आदित्य कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. सतीश कचरे, कृषि कार्यानुभव कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. संदीप मोरे, कृषि विस्तार विभागाचे प्रमुख श्री. धावणे सर यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले.

## जिल्हाधिकारी कार्यालयाचा आंधळा कारभार ,सर्वत्र घाणीचे साम्राज्य- मिलिंद सरपते

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्हाधिकारी कार्यालयाचा अंधाधूंद कारभार सुरूच असून कार्यालयात गुटखा खाऊन भिंती रंगवल्या जात असताना जिल्हाधिकारी अधिकारी कर्मचारी यांच्याकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. असे निवेदन मा.आयुक्त संभाजीनगर यांना ईमेल वर वंचितचे मिलींद सरपते यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले की जिल्हाधिकारी कार्यालयात घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. वाढत्या घाणीमुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले. जिल्हाधिकारी व अधिकारी समस्यांकडे दुर्लक्ष करत असल्याने नागरीकात संताप व्यक्त केला जात आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागाला जाणाऱ्या पायऱ्यावर गुटखा खाऊन भिंती रंगवणाऱ्या वर कारवाई होताना दिसून येत नाही वारंवार तक्रार व निवेदन देऊनही दखल घेतली जात नाही. जिल्हाधिकारी कार्यालयातील संकीर्ण विभागाचे श्री मुंडे यांनी उपजिल्हाधिकाऱ्यांच्या पत्राला केराची टोपली दाखवत आजपर्यंत कोणतीही कारवाई केलेली नाही.आज कार्यालयात गेल्यानंतर ते स्पष्ट झाले. कामचुकार कर्मचारी मुंडे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात यावी त्यांना विचारणा केली असता मुंडे म्हणतात मी गुटखा खात नाही. जे खातात ते करतील. कार्यवाही न केल्यामुळे विविध भागांमध्ये घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. स्वच्छतेबाबत अधिकारी लक्ष देत नसल्याने नागरीकांमध्ये निष्क्रीय अधिकार्यांविरोधात संताप व्यक्त केला जात असल्याने त्याचा दुर्गंधीचा त्रास सर्वसामान्यांना कार्यालयात येताना सहन करावा लागत आहे. समस्यांबाबत मा आयुक्त यांनी लक्ष घालून जिल्हाधिकाऱ्यांचे कान टोचावेत, व कामचुकार संकीर्ण विभागाचे मुंडे यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करावी कारवाई न झाल्यास २६ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी हटाव बीड जिल्हा बचाव आंदोलन करण्यात येईल. यांची शासन दरबारी नोंद असावी.बीड जिल्हाधिकारी कार्यालय स्वच्छ करून कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी सामाजिक तथा सदस्य वंचित बहुजन आघाडी बीड शहर मिलिंद सरपते यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

# छावा क्रांतिवीर सेनेचे ग्रामीण रस्ते विकास संस्था बीड कार्यालयासमोर विविध मागण्यासाठी आमरण उपोषण

गेवराई (प्रतिनिधी)

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत पॅकेज क्र.इएए-६८,,ए मधील राममा २११ ते ताकडगाव हा रस्ता करण्यात आला होता. परंतु हा,रस्ता निष्कृष्ट दर्जा केल्यामुळे आता रस्त्याला जागोजागी खड्डे पडलेले दिसत आहेत,रस्ता अनेक ठिकाणी दबला गेला आहे.रस्ता करताना प्रामुख्याने कामाचा तंत्रिका अहवाल, मोजमाप पुस्तिका, रस्ता बांधकामाची गुणवत्ता, व निरीक्षणा नोंदी कामाचा दोष दायित्व कालावधी, हे सर्व कागदपत्रे दाखवून बिल उचलण्याचे काम केले असून व अंदाजपत्रकानुसार रस्त्याचे काम केलेले नाही.तसेच गावापर्यंत दोन्ही बाजूने रुंदीकरण केले परंतु गाव लागताच ऐकाच बाजूने रस्त्याचे रुंदीकरण केले आहे.त्यामुळे गोरगरीब लोकांचे नुकसान झाले आहे.ज्या लोकांची जागा रस्त्यात गेली आहे त्यांना न कळवताच त्यांच्या मालकी हक्काच्या जागेवर रस्ता करून संबधित गुत्तेदाराणे त्यांच्यावर अन्याय केला आहे.तसेच रस्त्या दुरुस्तीच्या नावाखाली अर्धा रस्ता दुरुस्त करून अर्ध्या रस्त्यात पडलेले खड्डे तसेच आहेत.काही ठिकाणी तर रस्ता अक्षरशः खचला आहे.म्हणून छावा क्रांतिवीर सेनेकडून आज आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे.

प्रमुख मागण्या /मुद्दे

१)गेवराई ते ताकडगाव रस्त्याचा तत्काळ स्थळ पंचनामा करावा. २)दोषी आढळल्यास चंद्रगुप्त कंट्रक्शनला कायम स्वरुपी काळ्या यादीत समाविष्ट करावे ३)गावातील नागरिकांना न कळवताच चंद्रगुप्त कन्ट्रक्शननी त्यांच्या




मालकीच्या जागेवर रस्ता केला.म्हणून चंद्रगुप्त कन्ट्रक्शनच्या मालकावर योग्य ती कार्यवाही करावी. ४)गावातील पाणी नळ्या न टाकतच रस्ता केला आहे.म्हणून नागरिकांचे हाल होत आहेत याला जबाबदार चंद्रगुप्त कन्ट्रक्शन व जे आपल्या कर्यकाचे अधिकारी असतील त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी. ५)अंदाज पत्रकानुसर काम न केल्यामुळे शासनाची फसवणूक केली म्हणून योग्य ती कार्यवाही करावी. ६) जल जीवन मिशनच्या माध्यमातून काम करत असताना, परवानगी न घेताच रस्ता खोदल्या प्रकरणी जल जीवन मिशनच्या संबधित कॉन्टॅक्टदारावर तत्काळ गुन्हा दाखल करावा. जोपर्यंत या सर्व मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत उपोषण सोडणार नसल्याचे जिल्हाध्यक्ष राहुल चाळक यांनी सांगितले.यावेळी गावातील नागरिक मुकेश मोटे,अविनाश मोटे, दत्ता गिरी,मनोज केदार, अभिषेक जामकर,छावा संघटनेचे प्रदेश सरचिटणीस अनिल राऊत, चद्रकांत बारे उपस्थित होते.



**केज मतदारसंघातील नांदुरघाट गटातील बंदेवाडी येथील रस्त्यांचा कामाचा शुभारंभ अक्षय भैय्या मुंदडा यांच्या शुभहस्ते करण्यात आला यावेळेस तालुकाध्यक्ष भगवान केदार, सरपंच डोरले संतोष, संतोष जाधव, सुनील घोळवे, राहुल गदळे, जगताप तात्या, आश्रुबा जगताप,भिसे साहेब, सासवडे मॅडम,**



शहरातील श्री.कल्याण कुलकर्णी यांच्या नवीन निवासस्थानाची वास्तुशांती दोन दिवसापूर्वी झाली होती. आज माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांनी त्यांच्या नूतन निवासस्थानी सदिच्छा भेट देऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी राजेंद्र मुनोत, संतोष पवार, दिलीप खिस्ती, अरुण डाके,सखाराम म्हस्के, गणपत डोईफोडे आदींची उपस्थित होते.



मारुती मंदिराच्या कलशारोहन निमीत्त हभप रामरावजी ढोक महाराज यांच्या किर्तनास उपस्थित राहुन किर्तनाचा आस्वाद घेताना आ. नमिताताई अक्षय मुंदडा व ईतर मान्यवर.



**बीड शहरातील अमन लाँन्स येथे रिजवान फरोकी यांचा मुलगा फुरखान व जाकेर खान यांची मुलगी अदिबा यांच्या निकाह समारंभास माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.**




**दिनांक १८ १२ २०२३ रोजी आडस तालुका केज जि.बीड येथे RPI शाखा पुनरुजीवन कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षता – मा. संदिपान तात्या हजारे (बीड जि. कार्याध्यक्ष), प्रमुख मार्गदर्शक – मा.महेंद्र निकाळजे (रिपाई नेते) प्रमुख अतिथी –मा. मनोजभाऊ इंगळे (युवा नेते बीड जिल्ह), (केज तालुका सल्लागार) बाबुराव गालफाडे, गोरख गायकवाड (धारूर तालुका नेते), रोहिदास मस्के (अंबाजोगाई तालुका नेते), किशोर गोरे (युवा अंबाजोगाई तालुका नेते), अमोल मस्के (केज शहर सचिव), नवनाथ तपसे (मराठा आघाडी केज तालुका अध्यक्ष) उपस्थित होते. प्रास्ताविक – देवानंद वाघमारे (केज तालुका उपाध्यक्ष) संचलन – सुनील हजारे केज तालुका अध्यक्ष आभार प्रदर्शन – भीमराव गायकवाड (अध्यक्ष आडस) यांनी मानले.**

प्रसंगी आडस शाखेची नवीन कार्यकारणी घोषित करून पदाधिकाऱ्यांचा सत्कार व नियुक्ती पत्र मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. नूतन कार्यकारणी पुढील प्रमाणे अध्यक्ष – भिमराव गायकवाड, उपाध्यक्ष – चंद्रकांत हजारे, कार्याध्यक्ष – विष्णू वाघमारे, सचिव – कैलास सरवदे, संरक्षण प्रमुख – राजाभाऊ पोटभरे तर सदस्य – बबन उमाप, राजेभाऊ गालफाडे, केशव साळवे, अमोल वाघमारे, प्रकाश पोटभरे, बालासाहेब पोटभरे, बी एस वाघमारे, सुरज वाघमारे, क्षितिज जोगदंड, उमेश वाघमारे, अरविंद वाघमारे, शेषेराव उमाप, महादेव पोटभरे यांची निवड करण्यात आली.

# ट्रॅक्टरचे दोन तुकडे तर कार चक्काचूर: दोन ठार तीन गंभीर

बीड : ट्रॅक्टर व कारची धडक होऊन घडलेल्या भीषण अपघातात आई व मुलगा ठार झाला तर इतर तिघे गंभीर जखमी झाल्याची घटना रात्री बीड-तेलगाव रस्त्यावर पोखरी शिवारात घडली आहे. एकाने विषारी द्रव्ये प्राशन केल्याने त्यास घाईघाईने उपचारासाठी बीड येथे घेऊन येताना काळाने झडप घातली असून एका वाचविण्यासाठी प्रयत्न करताना दोघांना प्राणाला मुकावे लागले असल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. मयत व जखमी वडवणी तालुक्यातील आहेत.





वडवणी तालुक्यातील उपळी येथील नितीन सुभाष वेताळ यांनी सोमवारी ( दि. १८ ) रात्री विषारी द्रव्ये प्राशन केले. हा प्रकार लक्षात येताच त्यास स्विफ्ट कार क्र. एम.एच.०२ बीजी ९३९१ मध्ये उपचारासाठी बीडला घेऊन येत होते. दरम्यान कार मैंदा व घाटसावळीच्या मध्ये पोखरी शिवारात आली असता ऊस घेऊन आलेल्या ट्रॅक्टर व या कारची धडक होऊन घडलेल्या अपघातात रत्नमाला केशव पवार ( वय ४१ वर्ष ) , प्रदीप केशव पवार ( वय २४ वर्ष ) दोघे रहाणार उपळी ता. वडवणी या दोघा माय-लेकाचा मृत्यू झाला. नितीन सुभाष वेताळ, अनुसया सुभाष वेताळ, प्रमोद देविदास चव्हाण हे तिघे गंभीर जखमी झाले. हा अपघात इतका भीषण आहे की, ट्रॅक्टरचे हेड तुटून दोन तुकडे झाले तर कार चक्काचूर होऊन रस्त्याच्या खाली खड्ड्यात जाऊन पडली. जखमींवर बीड येथे दवाखान्यात उपचार सुरू आहेत. या घटनेने उपळी गावावर शोककळा पसरली असून हळहळ व्यक्त केली जात आहे.

# बीडची चोरी करणारी महिलांची टोळी श्रीरामपूरमध्ये पकडली

**अहमदनगर : महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण चोरून पळ काढणार्या महिला गुन्हेगारांना श्रीरामपूरच्या पोलिसांनी पाठलाग करत ताब्यात घेतले. सदरील या गुन्हेगारांकडून १७ लाख ७७ हजाराचे दागिने जप्त करण्यात आले आहे. हे सर्व गुन्हेगार बीड येथील आहेत.**

नेवासा-श्रीरामपूर रोडवर पाठलाग करत महिला टोळीला अटक करण्यात आली. आसराबाई ऊर्फ लक्ष्मी ऊर्फ आशाबाई तुकाराम पवार (वय ५५, रा. बार्शी नाका, जि. बीड), सुनीता योगेश जाधव (वय २५, रा. गांधीनगर, नाळवंडी नाका, मोहटा देवी मंदिराजवळ, ता. जि. बीड), वसंत विश्वनाथ मुंजाळ (वय ३८, धंदा- मेकॅनिक, एस.टी. डेपो बीड, रा. हिरापूर, ता. गेवराई, जि. बीड), जुबेर रज्जाक पठाण (वय २९, रा. मुन्नावर मस्जिद, तेलगाव नाका, ता. जि. बीड), कैशल्या सर्जेराव गायकवाड (वय ५२, रा. नाळवंडी नाका, जि. बीड), कमल विठ्ठल जाधव (वय ५३, रा. नाळवंडी नाका, खडी मशीनजवळ बीड), सखुबाई सखाराम कुन्हाडे (वय ४०, रा. माऊलीनगर गेवराई, जि. बीड), गवळण पांडुरंग गायकवाड (वय ३५, रा. उकंडा, ता. पाटोदा, जि. बीड), शालनबाई लक्ष्मण जाधव (वय ५५, रा. नाळवंडी, जि. बीड) असे अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

राहुरी कृषी विद्यापीठ येथील प्राध्यापिका धनश्री हंबीरराव सरनौबत या मैत्रिणीला भेटण्यासाठी श्रीरामपूर येथे आल्या होत्या. त्या परत जाण्यासाठी श्रीरामपूर बसस्थानकात आल्या. बसमध्ये बसत असताना त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मिनी गंठण चोरट्याने चोरून नेले होते. याबाबत श्रीरामपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होता. तांत्रिक विश्लेषणात या गुन्ह्यात स्कॉर्पिओ (एमएच १२, जी. एफ ५६३७) चा वापर झाल्याचे समोर आले. ही स्कॉर्पिओ नेवासा येथून श्रीरामपूरकडे येत आहे, अशी माहिती श्रीरामपूर पोलिसांना मिळाली. पोलिसांनी हरेगाव फाटा येथे नाकांबदी लावली. सदरची स्कॉर्पिओ येताना पोलिसांना दिसली. चालकाने श्रीरामपूरच्या दिशेने स्कॉर्पिओ पळवली. मोठ्या शिताफीने पोलिसांनी श्रीरामपूरजवळ चारचाकी ताब्यात घेऊन महिला टोळीला अटक केली.

# दुष्काळी मदतीबाबत केंद्राकडे बोट, शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासनच

## मुख्यमंत्री शिंदेंची विधानसभेत घोषणा

नागपूर - दुष्काळ, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना अशी मदत जाहीर केली जाईल की विरोधक तोंडात बोट घालतील, असे मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांनी मागील आठवड्यात विधिमंडळात सांगितले होते. मात्र सोमवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर उत्तर देताना मंत्री पाटील यांचे आश्वासन सपशेल खोटे ठरवत त्यांना तोंडावर पाडले.

'गेल्या दीड वर्षात आम्ही विविध योजनांद्वारे बळीराजाला ४४,२७८ कोटींची विक्रमी मदत केल्याचा दावा करताना शिंदेंनी दुष्काळी मदतीसाठी केंद्राकडे बोट दाखवले. तर अतिवृष्टीग्रस्तांना १७५७ कोटींपैकी ३०० कोटी रुपयांचे आतापर्यंत वाटप झाले आहे', एवढेच सांगून शिंदे मोकळे झाले. या वर्षी ५ लाख धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी २० हजार रुपये बोनस एवढाच ठोस निर्णय जाहीर केला.

विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केलेल्या चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी दीड वर्षात केलेल्या कामांची व अर्थसंकल्पात जाहीर योजनांची पुन्हा उजळणी केली. गेल्या सरकारच्या काळात जाहीर झालेल्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेतून ४४ लाखांपैकी ६ लाख ५६ हजार शेतकरी सॉफ्टवेअरमधील त्रुटीमुळे लाभापासून वंचित राहिले होते. त्यांनाही कर्जमाफी देऊ, अशी घोषणाही त्यांनी केली.

ते म्हणाले की, 'यंदा कमी पाऊस पडलेल्या ४० तालुक्यात दुष्काळ जाहीर केला आहे. केंद्रीय पथकाने या १५ पैकी ९ जिल्ह्यातील गावांची पाहणी केली. येथील शेतकऱ्यांना २५८७ कोटी रुपये मदत देण्याबाबत केंद्राला पत्र पाठवले आहे. ही मदत लवकर मिळण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे बैठक होणार आहे. जानेवारी ते ऑक्टोबर दरम्यान अतिवृष्टी, अवकाळीमुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना १७५७ कोटींची मदत दिली जाईल. त्यापैकी ३०० कोटीपेक्षा जास्त रकमेचे वाटपही झाले आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या प्रत्येकी ५० हजार रुपये याप्रमाणे आतापर्यंत १४ लाख ३१ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात ५,१९० कोटी रुपये जमा केले आहेत, असे मुख्यमंत्री म्हणाले.

कमी पाऊस झालेल्या पण केंद्राच्या निकषात न बसलेल्या १०२१ महसूल मंडळांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर केली आहे.




## जिल्ह्यातील सरपंच, ग्रामरोजगार सेवक, ग्रामसेवक संपावर पंचायत समिती कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन

बीड : सरपंच, उपसरपंच, ग्रामरोजगार सेवकांच्या मानधनात वाढ करण्यात यावी यासह इतर मागण्यासाठी बेमुदत आंदोलन सुरू असून पंचायत समिती कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. यावेळी अनेकांची उपस्थिती होती. ग्रामपंचायत सदस्यांचा भत्ता, सरपंच, उपसरपंच यांचे थकीत मानधन तात्काळ अदा करण्यात यावे यासह इतर मागण्यासाठी बीड जिल्ह्यातील १०३३ ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामरोजगार सेवक, ग्रामसेवक, ऑपरेटर बेमुदत संपावर गेले असून तालुक्यातील ग्रामसेवक, ग्रामरोजगारसेवकांनी पंचायत समिती कार्यालयासमोर आज ठिय्या आंदोलन केले. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.

# लोकसभेतील ३१ खासदार निलंबित, संसदेतील गदारोळानंतर संसदेतील खासदारांचे निलंबन सुरूच

नवी दिल्ली : संसदेच्या सुरक्षेच्या मुद्द्यावरून गोंधळ घालणाऱ्या विरोधी पक्षाच्या ३१ खासदारांना निलंबित करण्यात आलंआहे. त्यामध्ये लोकसभा अध्यक्षांनी काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी आणि इतर प्रमुख खासदारांचा समावेश आहे. आजही विरोधी पक्ष संसदेच्या सुरक्षेबाबतच्या आपल्या मागण्यांवर ठाम राहिले. यावरून लोकसभा आणि राज्यसभेत प्रचंड गदारोळ झाला. त्यानंतर या सर्व ३१ खासदारांना हिवाळी अधिवेशनाच्या काळापर्यंत निलंबित करण्यात आलं आहे. या आधी दोनच दिवसांपूर्वी विरोधी पक्षांच्या १३ खासदारांना निलंबित करण्यात आलं होतं.



लोकसभेच्या सुरक्षेच्या उल्लंघनाबाबत दोन्ही सभागृहात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी निवेदन देण्याची मागणी विरोधी पक्ष सातत्याने करत आहेत. खासदार निलंबित आणि संसदेचं कामकाज दिवसभरासाठी स्थगित

गेल्या आठवड्यात संसदेची सुरक्षा भेदून काही तरूण लोकसभेत घुसले होते. त्यानंतर त्याच मुद्द्यावरून आता विरोधी पक्ष आक्रमक झाले आहेत. संसदेच्या सुरक्षेच्या मुद्द्यावर चर्चा करण्याची मागणी त्यांनी केली. त्यानंतर लोकसभा आणि राज्यसभेत या मुद्द्यावरून गोंधळाची स्थिती निर्माण झाली.

संसदेत झालेल्या या गोंधळानंतर संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी विरोधी पक्षांच्या ३१ खासदारांना निलंबित करण्याचा प्रस्ताव मांडला. संसदेच्या कामकाजात अडथळे आणल्याप्रकरणी अध्यक्षांनी गोंधळ घालणाऱ्या ३१ खासदारांना निलंबित केलं. त्यामध्ये काँग्रेसचे नेते अधीर रंजन चौधरी, टीआर बालू आणि दया निधी मारन यांचा समावेश आहे. त्यानंतर संसदेचं कामकाज दिवसभरासाठी स्थगित करण्यात आलं.

आज कोणत्या खासदारांना निलंबित करण्यात आले?

अधीर रंजन चौधरी, के जय कुमार, अपूर्व पोद्दार, प्रसून बॅनर्जी, मोहम्मद वसीर, जी सेल्वम, सीएन अन्नादुराई, डॉ टी सुमाथी, के नवस्कानी, के वीरस्वामी, एनके प्रेमचंद्रन, सौगता रॉय, शताब्दी रॉय, असित कुमार मल, कौशलेंद्र कुमार यांच्याशिवाय , अँटोनी अँटोनी, एसएस पलानामनिकम, अब्दुल खालिद, तिरुवरुस्कर, विजय बसंत, प्रतिमा मंडल, काकोली घोष, के मुरलीधरन, सुनील कुमार मंडल, एस राम लिंगम, के सुरेश, अमर सिंह, राजमोहन उन्नीथन, गौरव गोगोई आणि टीआर बालू.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT